**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. ६४ दिनांक ०४/११/२०२४**

# सफाळा पोलीस ठाणे हद्दीतुन गोडावुन फोडून १४,६०,०००/- रुपये किं.च्या टिव्ही चोरी करणा-या आरोपीस अटक करण्यात सफाळा पोलीसांना यश

सफाळा पोलीस ठाणे हद्दीत दि.२९/१०/२०२४ रोजी सायंकाळी ०७.३० वाजता ते दि.३०/१०/२०२४ रोजी सकाळी ०९.०० वाजताचे दरम्यान अज्ञात आरोपीने मौजे सफाळे पूर्व येथील सपना इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड मोबाईल या दुकानाचे गोडावूनचे दरवाज्याचे कुलूप तोडून गोडावूनमधील एकूण १४,६०,०००/- रुपये किं.च्या **LG**, **SAMSUNG**, **ONIDA**, **TCL**, **BPL** या विविध कंपन्यांच्या एलईडी टिव्ही घरफोडी चोरी करुन चोरुन नेल्या होत्या. त्याबाबत सफाळा पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा रजि.नं. ८५/२०२४ बी.एन.एस.कलम ३०५,३३१(४) अन्वये दिनांक ३०/१०/२०२४ रोजी गुन्हा नोंदविण्यात आलेला होता.

वरील गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेवून मा.श्री.बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर मा.श्री.विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक पालघर, मा.श्री.अभिजीत धाराशिवकर, उप विभागीय पोलीस अधिकारी, पालघर यांनी तपास पथक तयार करून योग्य त्या सुचना देऊन मार्गदर्शन केले. त्याप्रमाणे सफाळा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि/दत्ता शेळके, पोउनि/डी.बी.सावंत व पोलीस अंमलदार १) पो.हवा/८५० कल्पेश केणी २) पो.हवा/२०० के.एस.बांगड ३) पोना/२२ व्ही.एन.सातपुते ४) पो.हवा/८१ महेंद्र शर्मा ५) पोहवा/७५४ ए.बी.चौधरी ४) पोअं/१२०२ एस एस.आर.चिमकर सर्व नेमणुक सफाळा पोलीस ठाणे यांचे पथक तयार करून रवाना केले. गुन्हेगाराची गुन्हे करण्याची पध्दत तसेच सीसीटिव्ही फुटेज व इतर तांत्रिक व गोपनीय बातमीदारांच्या मदतीने सदर पथकाने दि.०४/११/२०२४ रोजी आरोपी भोलेनाथ बाळाराम पाटील, वय २४ वर्षे, रा. मु.सोनाले, पो.दांडेकरवाडी, ता.भिवंडी, जि.ठाणे यास सापळा रचून त्यास ताब्यात घेवून दिनांक ४/११/२०२४ रोजी १२.०० वाजता अटक केलेली असून त्याचेकडून गुन्हयातील गेला माल १४,६०,०००/- रुपये किं.च्या **LG**, **SAMSUNG**, **ONIDA**, **TCL**, **BPL** या विविध कंपन्यांच्या ३२ इंच, ४३ इंच, ५५ इंच,६५ इंचीच्या एकूण ३० एलईडी टिव्ही हस्तगत केलेल्या आहेत. तसेच आरोपीने गुन्हा करण्याकरीता वापरलेले वाहन १०,००,०००/ रुपये किं.चा टाटा इंट्रा टेम्पो नंबर **MH04/KU-0184** हा जप्त केलेला आहे. सदर गुन्हयामध्ये एकूण २४,६०,०००/- रुपये किं.चा मुद्देमाल जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झालेले आहे.

सदर गुन्ह्याचा अधिक तपास हा पोलीस उप निरीक्षक डि.बी. सावंत, नेम. सफाळा पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कारवाई मा.श्री.बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर, मा.श्री. विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक पालघर, मा.श्री.अभिजीत धाराशिवकर, उप विभागीय पोलीस अधिकारी, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली सफाळा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि/दत्ता शेळके, पोउनि/डी.बी.सावंत व पोलीस अंमलदार १)पो.हवा/८५० कल्पेश केणी २) पो.हवा/२०० के.एस.बांगड ३) पोना/२२ व्ही.एन.सातपुते ४) पो.हवा/८१ महेंद्र शर्मा ५) पोहवा/७५४ ए.बी.चौधरी ६) पोअं/१२०२ एस.आर.चिमकर सर्व नेमणूक- सफाळा पोस्टे यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.